# वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


| महाराष्ट्र पोलीस सदरक्षणाय खलनिग्रहणाय | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ २२३ /२०२४ दि. २६/१०/२०२४

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभागाचे हददीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने विविध राजकीय पक्षांचे उमेदवार यांचेकडुन** दिनांक २६/१०/२०२४ रोजी ते दि.२९/१०/२०२४ सकाळी०७:०० वा ते १९:००वा. पावेतो **नामनिर्देशन पत्र दाखल करणे करीता** आयटीआय कॉलेज, श्रीनगर, वागळे ईस्टेट या ठिकाणी जाणार आहेत. सदर वेळी मार्गावर व परीसरात वाहतुक कोंडी होवु नये व वाहतुक सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंदी** – | १) जुनागाव, कैलासनगर परीसरातील सर्व वाहने ही धर्मवीर चौक तुन उजवीकडे वळुन २२ नंबर सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धर्मवीर चौक** येथे "**प्रवेश बंद**" करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदर जुनागाव, कैलासनगर परीसरातील सर्व प्रकारची वाहने ही धर्मवीर चौक परीसरातुन धर्मवीर चौकातुन सरळ रोड नं.२८ ने जावुन हनुमान नगर चौक येथुन उजवीकडे वळुन वागळे बस डेपो मार्गे साठे नगर चौक रोड नं.२२ येथुन इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंदी** – | २) २२ नं. सर्कलकडुन आय.टी.आय. कॉलेज, धर्मवीर नगर, रामनगर, हनुमान नगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना आय.टी.आय. कॉलेजच्या जवळील सी.पी.तलाव गेट येथे "**प्रवेश बंद**" करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** – | सदर सर्व प्रकारची वाहने ही आय.टी.आय. कॉलेजच्या जवळील सी.पी.तलाव गेट येथुन डावीकडे व उजवी कडे वळुन इच्छित स्थळी जातील. |

सदरची अधिसुचना दिनांक २६/१०/२०२४ रोजी ते दि.२९/१०/२०२४ सकाळी०७:०० वा ते १९:००वा. पर्यत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
–जिल्हाधिकारी, ठाणे
–आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
–अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
–प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
–पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५, ठाणे.
–पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

CamScanner

–परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.

–विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

–नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

–ठाणे पोलीस पत्रक

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

स.पो.आ. ठाणे/वागळे वाहतूक विभाग,/पोनि वागळे, नौपाडा वाहतूक उपविभाग.

CamScanner